# दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र आयोजित
## आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा २०१७

प्रति
प्राचार्य
____________________
____________________
____________________

दिनांक:

**विषय : आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा**

महोदय,

वरील स्पर्धा दिनांक २९ ऑक्टोबर २०१७ रोजी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, दादर येथे दुपारी २.०० वाजता भरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपल्या महाविद्यालयातर्फे प्रवेशिका पाठवाव्यात ही विनंती. विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी कृपया सोबतचे स्पर्धेचे नियम सूचना फलकावर लावावेत.

आपल्या सहकार्याबद्दल आभार.

आपली
उषा पोतनीस
कार्यवाह

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र
इमेल:dadarmatunga@gmail.com
१२२ – ए, जे. के. सावंत मार्ग,
माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी क्र. २४३० ४१५०

# दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र आयोजित
## आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा २०१७

### नियम व अटी

१. ही स्पर्धा मुंबई, पुणे, शिवाजी नगर, नागपूर, मराठवाडा, एस. एन. डी. टी., बडोदा, मध्य प्रदेश आणि गोवा या विद्यापीठांच्या ज्युनियर आणि सिनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. आकाशवाणी व दूरदर्शन मान्यताप्राप्त कलावंत तसेच या स्पर्धेत पूर्वी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवणारे विद्यार्थी ह्यांना या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. स्पर्धेत फक्त मराठी किंवा हिंदी भाषेतील गीत, गझल, भावगीत, भक्तीगीत किंवा अभंग सादर करता येईल. चित्रपट गीतांना व नाट्यसंगीताला परवानगी नाही.

३. प्रत्येक स्पर्धकाला आपले गीत सादर करण्यासाठी पाच मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

४. हार्मोनियम, तबला आणि तानपुरा इतकीच वाद्ये साथ संगतीसाठी वापरता येतील. हार्मोनियम, तबला या वाद्यांची आणि वादकांची व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात येईल. स्पर्धक स्वखर्चाने स्वत:च्या पसंतीचे वादक आणू शकतील. हार्मोनियम व तबला या साथीशिवाय स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

५. गीतांच्या लिखित शब्दांची प्रत समोर ठेवून गाता येणार नाही.

६. संपूर्ण भरलेली प्रवेशिका प्राचार्यांच्या स्वाक्षरीसहित दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, दादर, मुंबई येथे २६ ऑक्टोबर २०१७ पूर्वी प्रवेश फी रु.१००/- सहित पोहोचणे आवश्यक आहे. बाहेरगावातील स्पर्धकांनी रु.१००/- मनीऑर्डरने खालील पत्त्यावर पाठवावेत.

७. स्पर्धा प्राथमिक आणि अंतिम अशा दोन फेऱ्यात घेण्यात येईल.
मुंबई केंद्रावरील प्राथमिक स्पर्धा दिनांक २९ ऑक्टोबर २०१७ या दिवशी दुपारी २.०० वाजता दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र येथे घेण्यात येईल. सर्व स्पर्धकांनी स्पर्धेसाठी वरील केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८. प्राथमिक स्पर्धेतून निवडलेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र येथे १७ डिसेंबर २०१७ रोजी सकाळी ९.०० वाजता घेण्यात येईल.

८ अंतिम स्पर्धेसाठी निवडलेल्या स्पर्धकांनी स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८.३० वाजता उपस्थित राहावे. मुंबईबाहेरील स्पर्धकांस जाण्यायेण्याचे द्वितीय वर्गाचे शयनयानाचे रेल्वे भाडे देण्यात येईल. निवासाची व्यवस्था स्पर्धकास करावी लागेल.

९ अंतिम स्पर्धेसाठी निवडलेल्या स्पर्धकांना त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही तीन गीतांची यादी २५ नोव्हेंबर २०१७ पूर्वी सादर करावी लागेल. त्यापैकी परीक्षकांनी निवडलेले गीत स्पर्धकाला सादरीकरणापूर्वी दहा मिनिटे आधी सांगण्यात येईल. परीक्षकांच्या निवडीत बदल करुन मिळणार नाही.

१० अंतिम स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक रु. पाच हजार रोख व गुणवत्तापत्रक | श्रीमती लीलादेवी सोमाणी |
| दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र व | श्रीमती मधुबाला चावला |
| कामेरकर कुटुंबीय फिरता चषक | श्रीमती सुधा राव |
| द्वितीय पारितोषिक रु.तीन हजार रोख व गुणवत्तापत्रक | श्री. बाळ जव्हेरी आणि |
| तृतीय पारितोषिक रु.दोन हजार रोख व गुणवत्तापत्रक | श्रीमती अंजली कुसरे |
| | यांच्यातर्फे |

उत्तेजनार्थ पारितोषिक - रु. पाचशे व गुणवत्तापत्रक

प्राथमिक फेरीत निवड झालेल्या प्रत्येक केंद्रावरील सर्वोत्कृष्ट स्पर्धकास पारितोषिक रोख रु. पाचशे अंतिम फेरीच्या वेळी देण्यात येईल. प्राथमिक फेरीतील सर्व स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रथम पारितोषिक विजेत्या स्पर्धकाच्या महाविद्यालयास कै. विष्णू रामचंद्र केळकर स्मृती फिरती ढाल प्रदान करण्यात येईल. महाविद्यालयाने सहा महिन्यात ही ढाल परत करायची आहे.

११ परीक्षकांचा निर्णय अंतिम व स्पर्धकावर बंधनकारक राहील.

१२ आवश्यकतेनुसार वरील नियम व अटीत बदल करण्याचा अधिकार संस्थेस राहील.

अधिक माहितीसाठी संपर्क
उषा पोतनीस
दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र
भ्रमणध्वनी क्र. ९८९२५ ८६३८८

## दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र आयोजित
## आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा २०१७
### प्रवेश अर्ज

दिनांक:

नाव :

पत्ता:

इ.मेल:

दूरध्वनी / भ्रमणध्वनी: जन्मदिनांक:

महाविद्यालय: वर्ष:

पर्धेचे सर्व नियम आणि अटी मी वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

स्पर्धकाची सही

मी याद्वारे प्रमाणपत्र देतो की, उपनिर्दिष्ट स्पर्धक या महाविद्यालयाच्या पटावरील विद्यार्थी आहे. स्पर्धेचे सर्व नियम आणि अटी मी वाचल्या असून त्या आम्हास मान्य आहेत.

प्राचार्यांची सही
महाविद्यालयाचा शिक्का
दूरध्वनी क्र:

---

दिनांक:

### आंतरमहावद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा

पावती

श्री / श्रीमती यांच्याकडून स्पर्धेची फी रु.१००/- रोख मिळाली.

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, यांच्याकरिता